॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव २७ (        ) मराठीची परंपरा समृध्द करणारे नाट्यगीत, लोकगीत, दिंडीनृत्य, अभंग, गझल आणि सामाजिक विसंगतीवर प्रहार करणारे विडंबन नाट्य, सोबतच ग्रंथ दिंडी सादर करत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयाच्या विद्यार्थी कलावंतांनी मराठी भाषा दिवस उत्साहात साजरा केला.

महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिनानिमित्त छत्रपती संभाजीराजे नाट्यमंदीर, महाबळ रोड येथे युवारंग युवक महोत्सवातील विद्यार्थी कलावंतांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस हा मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त आयोजित या कार्यक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, जळगाव विभागाचे प्रा.प्रशांत मगर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य एल.पी.देशमुख, दीपक बंडू पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल, परीक्षा विभागाचे संचालक बी.पी.पाटील, प्रा.सत्यजित साळवे यांची उपस्थिती होते.

सांस्कृतिक कार्यक्रमापूर्वी सायंकाळी ४ वाजता भाऊंचे उद्यान ते छत्रपती संभाजीराजे नाट्यमंदिर पर्यंत ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सजविलेल्या पालखीत भारताचे संविधान, बहिणाबाई चौधरी, कवी कुसुमाग्रज, ग.दि.माडगुळकर, पु.ल.देशपांडे, राम गणेश गडकरी यांची पुस्तके ठेवण्यात आली होती. मान्यवरांच्या हस्ते या दिंडीचे उद्‌घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० पेक्षा अधिक विद्यार्थी तसेच विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी दिंडीत सहभागी झाले होते. फेटे बांधलेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या दिंडीत एच.जे.थीम महाविद्यालय, मु.जे.महाविद्यालय, नुतन मराठा महाविद्यालय, धनाजी नाना समाजकार्य, शिरीष चौधरी कला, वाणिज्य महाविद्यालय, अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय, मणियार विधी महाविद्यालय यांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. नाट्यगृहात दिंडीचा समारोप झाल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

तीन तासाच्या या भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहात आपला कलाप्रकार सादर केला. श्रृती जोशी यांनी बहिणाबाईंचे अरे संसार संसार हे गीत सादर करून कार्यक्रमाचा प्रारंभ झालो. चोपडा येथील महात्मा गांधी महाविद्यालयाने दिंडीनृत्य, प्रा.संजय पत्की यांचे नाट्यगीत, मु.जे.महाविद्यालय तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोराणे, प्रताप महाविद्यालय,अमळनेर आणि झेड.बी.पाटील महाविद्यालय धुळे येथील

पान २ वर

विद्यार्थ्यांचे विडंबन नाट्य, कुसुंबा येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे आदिवासी नृत्य, मु.जे.महाविद्यालयाचे समुहगीत, यासोबतच जामनेरच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे पावरा नृत्य, पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालयाचे कोळीनृत्य, गायत्री ठाकुरचे लावणीनृत्य, नाहाटा महाविद्यालयाचे लोकगीत यासोबतच सपना बाविस्कर हिचा एकपात्री प्रयोग, अक्षय गजभीये याचा अभंग, भाग्यश्री भंगाळे हिचे भावगीत, निकिता पाटील हिचा गोंधळ आणि विद्यापीठाच्या संगीत विभागाचे समुहगीत आदी कलाप्रकारांचा या सांस्कृतिक कार्यक्रमात समावेश होता. या सर्व कलावंतांना प्रेक्षकांनी उत्स्फुर्त दाद दिली. प्रारंभी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांचा संदेश प्रक्षेपीत करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सत्यजित साळवे यांनी केले. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन प्रणिता गुजर, वर्षा उपाध्ये आणि सारांश सोनार या विद्यार्थ्यांनी केले.

----------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१९ — दि. २७ फेब्रुवारी, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत //--<br>
(डॉ.सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी